नवनिर्मित चंदगड, नगरपंचायतीसाठी
प्रभाग रचना, आरक्षण व
सोडतीचा कार्यक्रम-२०१९

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

निवडणूक प्राथम्य

क्रमांक रानिआ/नप-२०१९/प्र.क्र.२/का.०६,
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांकः- २३ जानेवारी, २०१९.

प्रति,
जिल्हाधिकारी,
कोल्हापूर.

विषयः- नवनिर्मित चंदगड, नगरपंचायतीसाठी प्रभाग रचना, आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम-२०१९.

संदर्भः- १) आयोगाचे क्र.रानिआ/नप-२०१५/प्र.क्र.७ (२)/का-६, दि.२४/०७/२०१५ चे आदेश.
२) आयोगाचे क्र.रानिआ/नप-२०१५/प्र.क्र.७/का-६, दि.०७/०५/२०१६ चे आदेश.
३) महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०१७, दि.०२/११/२०१७.
४) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, (सुधारणा) अधिसूचना दि.१३/११/२०१७.
५) महाराष्ट्र नगर परिषदा व नगर पंचायती (प्रभागांमध्ये राखीव जागांचे वाटप करणे व त्या जागा चक्रानुक्रमे फिरविण्याची पध्दत) नियम, २०१६, दि.१३ जून, २०१६
६) आयोगाचे क्र.रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.१०/का-६, दि.१५/०६/२०१६ चे आदेश.

महोदय,

आपल्या जिल्ह्यातील नवनिर्मित चंदगड, नगरपंचायतीची सार्वत्रिक निवडणूक घेण्यासाठी महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ९ (२) मधील तरतुदींनुसार सदस्य संख्या विभागीय आयुक्त, पुणे विभाग यांनी शासन राजपत्रात दि.१६/०१/२०१९ रोजी प्रसिध्द केली आहे.

२. आणि ज्याअर्थी, शासनाने दिनांक ०२/११/२०१७ रोजी महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नागरी (सुधारणा) अध्यादेश २०१७, (सन २०१७ चा अध्यादेश क्रमांक २५)

अन्वये नगरपंचायतींमधील अध्यक्ष पदांच्या निवडणूका थेट जनतेमधून करण्याची अधिनियमात तरतूद लागू केली आहे. आयोगाने नगर परिषदा/नगर पंचायतींच्या प्रभाग रचनेबाबतचे सुधारित आदेश दिनांक १५/०६/२०१६ रोजी पारित केले आहेत. नगर पंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूका या **एक सदस्यीय पध्दतीनेच घ्यावयाच्या आहेत. तरी नवनिर्मित चंदगड, नगर पंचायतीची अधिनियमातील तरतुदींनुसार प्रभाग रचना तयार करावी. प्रभाग रचनेसाठी आवश्यक असलेल्या आदेशांच्या प्रती पत्रासोबत पाठविण्यात येत आहेत.**

३. आता या पत्राद्वारे **चंदगड**, नगर पंचायतीच्या निवडणुकीकरिता प्रभाग रचना, आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम **परिशिष्ट**-१ नुसार देण्यात येत आहे.

४. प्रभाग रचना अंतिम करण्याबाबतचे यापूर्वीचे संबंधित आदेश अधिक्रमित करुन राज्य निवडणूक आयुक्त यांनी त्यांचे अधिकार रानिआ आदेश क्र.रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.०७/का.६, दिनांक ०७/०५/२०१६ अन्वये संबंधित मुख्याधिकारी, जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्त यांना प्रदान केले आहेत.

५. **प्रभाग रचनेचे तीन मुख्य टप्पे राहणार आहेत:-**

(अ) आरक्षणासह प्रारुप प्रभाग रचना करणे,

(ब) हरकती व सूचनांवरील सुनावणी घेणे, व

(क) अंतिम प्रभाग रचना प्रसिध्द करणे.

६. **प्रभाग रचना करताना प्रामुख्याने खालील बाबींवर लक्ष देणे आवश्यक आहे. :-**

(i) या निवडणुकीकरिता जनगणना कार्यालयाची सन २०११ च्या जनगणनेची आकडेवारी वापरण्यात यावी. **सोबतच्या परिशिष्ट-२ मधील नमुन्यानुसार नगर पंचायतीचे मुख्याधिकारी यांचेकडून प्रमाणपत्र घेण्यात यावे.**

(ii) प्रभाग रचना करताना गुगल मॅप वापरुन, त्यावर प्रगणक गट दर्शविण्यात यावेत.

(iii) मुख्याधिकारी यांनी अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्या आरक्षणासह प्रारूप प्रभाग रचनेचा प्रस्ताव तयार करावा.

(iv) अनुसूचित जातीमधील महिला, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग आणि त्यामधील महिलांकरिता व सर्वसाधारण महिला याकरीता सोडत, जिल्हाधिकारी यांनी नियुक्त केलेल्या उपजिल्हाधिकारी दर्जापेक्षा कमी नसलेल्या अधिकाऱ्याच्या नियंत्रणाखाली राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या कार्यक्रमानुसार काढावी. **अनुसूचित जातीसाठी एकच पद देय असल्याने** याबाबत आयोगाच्या प्रभाग रचनेच्या दि.१५/०६/२०१६ च्या आदेशातील परिच्छेद क्र.२ (अ) मधील तरतुदींनुसार कार्यवाही करावी. **नगर पंचायतीमधील सर्व प्रवर्गातील महिला सदस्यांची कमाल संख्या एकूण ९ असेल.**

(v) सोडतीसाठी, फिरणारा पारदर्शक ड्रम/काचेचा बॉक्स वापरावा व त्यामध्ये टाकावयाच्या चिठ्ठयांचा आकार १५ सेंमी x १५ सेंमी पेक्षा जास्त नसावा. चिठ्ठीवरील अनुक्रमांक बाहेरुन दिसणार नाहीत याची दक्षता घ्यावी. त्यावर लावावयाचे रबर बँड एकाच रंगाचे असावेत. शक्य असल्यास सोडतीचे थेट प्रक्षेपण स्थानिक केबल टि.व्ही. वर करावे.

(vi) प्रभागरचना आणि आरक्षण आयोगाचे आदेश क्र.रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.१०/का.६, दि.१५/६/२०१६ नुसार करावी. या आदेशात विहित केलेल्या परिशिष्ट- १ ते ८ नुसारची माहिती तयार करुन ती सर्व जनतेच्या निदर्शनास आणण्याकरिता आवश्यक ती उपाययोजना करावी.

(vii) सदस्य पदाच्या आरक्षणाच्या सोडतीकरिता नोटीस, मतदारांच्या माहितीसाठी हरकती व सूचना, अंतिम प्रभाग रचना इ. याकरिता मोठ्या प्रमाणात प्रसिध्दी देण्यात यावी. उदा.

(a) स्थानिक वृत्तपत्रे, केबल टी.व्हि. वर

(b) नगर पंचायतींच्या प्रभाग समितीचे व इतर कार्यालयातील सूचना फलक,

(c) जिल्हाधिकारी व तहसील कार्यालयाचे सूचना फलक

(d) स्थानिक पातळीवर इतर माध्यमे.

(e) जिल्हाधिकारी व नगर पंचायतीच्या संकेत स्थळावर इ.

(viii) प्रारूप प्रभाग रचना व अंतीम प्रभाग रचना जिल्हाधिकारी व नगर पंचायतींच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करणे बंधनकारक राहील.

(ix) सोडतीच्यावेळी प्रारुप प्रभाग रचनेचा नकाशा व त्याच्या चतुःसिमा, सोडतीसाठी येणाऱ्या नागरिकांना सहज दिसेल अशा ठिकाणी लावून ठेवावा

(x) सोडत, जिल्हाधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या उपजिल्हाधिकारी दर्जापेक्षा कमी नसलेल्या अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली होईल. प्रभाग रचना, आरक्षण व सोडत इ.पासुन अंतिम अधिसूचना प्रसिध्द करण्यापर्यंतच्या कार्यवाहीवर नियंत्रण ठेवण्याकरीता उपजिल्हाधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्याची नेमणूक करावी. सोडतीची रंगीत तालीम फक्त संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांचे उपस्थितीत घ्यावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्तांच्या आदेशानुसार,

आपला,

(संजय सावंत) 23/09/2019
कक्ष अधिकारी,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

प्रत:-

१. संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
२. विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन, पुणे
३. प्रशासक तथा तहसिलदार, चंदगड, नगर पंचायत, जिल्हा-कोल्हापूर

## प्रभाग रचना, आरक्षण व सोडत कार्यक्रम

### परिशिष्ट -१

(नवनिर्मित चंदगड नगरपंचायतीसाठी प्रभाग रचना, आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम २०१९)

(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/नप-२०१९/प्र.क्र.२/का-०६, दि. २३/०१/२०१९ सोबतचे परिशिष्ट.)

| अ. क्र. | टप्पा | कार्यवाही कोणी करावयाची आहे. | टप्पा सुरु करण्याचा / संपविण्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | **अ) प्रारुप प्रभाग रचना आरक्षणासह** | | |
| १. | प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव (नगर पंचायतींच्या प्रभागांची संख्या, त्यांची प्रभागनिहाय एकूण व अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीची २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या, क्षेत्र, सीमांकन, नकाशा, अनुसूचित जाती आरक्षण यासह) जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करणे | मुख्याधिकारी | ११/०२/२०१९ (सोमवार) (पर्यंत) |
| २. | प्रारुप प्रभाग रचनेच्या प्रस्तावास मान्यता देणे | जिल्हाधिकारी | १४/०२/२०१९ (गुरुवार) (पर्यंत) |
| ३. | सदस्य पदांच्या आरक्षणाच्या सोडतीकरिता नोटीस प्रसिध्द करणे (जिल्हाधिकारी व नगर पंचायतींच्या वेबसाईटसह) | जिल्हाधिकारी | १८/०२/२०१९ (सोमवार) |
| ४. | नगर पंचायतींच्या सदस्य पदांच्या आरक्षणाची सोडत काढणे. (अनुसूचित जाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व त्यामधील महिला तसेच सर्वसाधारण प्रवर्गातील महिला) | मुख्याधिकारी | २१/०२/२०१९ (गुरुवार) |
| | **ब) हरकती व सूचना तसेच सुनावणी** | | |
| १. | प्रारुप प्रभाग रचना, प्रभागदर्शक नकाशे व सदस्य पदांच्या आरक्षणाची (अधिसूचना कलम १० नुसार) रहिवाश्यांच्या माहितीसाठी व हरकती तसेच सूचना मागविणेकरिता वृत्तपत्रात व स्थानिक पातळीवर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय व नगर पंचायतींच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणे | जिल्हाधिकारी | २६/०२/२०१९ (मंगळवार) पर्यंत |
| २. | हरकती व सूचना मागविण्याचा कालावधी | | २६/०२/२०१९ (मंगळवार) ते ०७/०३/२०१९ (गुरुवार) पर्यंत |
| ३. | प्राप्त हरकती व सूचनांवर सुनावणी देणे. | जिल्हाधिकारी | १३/०३/२०१९ (बुधवार) पर्यंत |
| ४. | हरकती व सूचनांच्या अनुषंगाने अभिप्राय देऊन विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन, पुणे विभाग यांचेकडे अहवाल पाठविणे | जिल्हाधिकारी | १६/०३/२०१९ (शनिवार) पर्यंत |

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | अंतिम प्रभाग रचनेस मान्यता देणे | विभागीय आयुक्त | २२/०३/२०१९ (शुक्रवार) पर्यंत |
| | **क) अंतिम प्रभाग रचना (प्रभागनिहाय एकूण लोकसंख्या, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीची लोकसंख्या तसेच आरक्षणासह)** | | |
| १. | अधिनियमातील कलम १० नुसार अंतिम अधिसूचना वृत्तपत्रात व स्थानिक पातळीवर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय व नगर पंचायतींच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणे | जिल्हाधिकारी | २७/०३/२०१९ (बुधवार) पर्यंत |

**टीपः- चंदगड, नगरपंचायतीची प्रभाग रचना, आरक्षण व सोडत इ.ते अंतिम अधिसूचना प्रसिध्द करण्यापर्यंतच्या कामावर नियंत्रण ठेवण्याकरीता जिल्हाधिकारी यांनी उप जिल्हाधिकारीपेक्षा कमी नसलेल्या दर्जाच्या अधिकाऱ्याची नेमणूक करावी.**

(२) २+१९२
23/01/2019

(संजय सावंत)
कक्ष अधिकारी,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

D:\HENDARE - २०१७\Arni N P - Copy.doc

# परिशिष्ट -२

## प्रमाणपत्र - प्रारुप प्रभाग रचना

जिल्हयाचे नाव - कोल्हापूर

नगरपंचायतीचे नाव - चंदगड

मी............................तहसिलदार तथा प्रशासक, चंदगड, नगरपंचायत, जिल्हा- कोल्हापूर असे प्रमाणित करतो की, चंदगड, नगरपंचायत २०१९ च्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी तयार करण्यात आलेली प्रारुप प्रभाग रचना खालील दक्षता घेऊन करण्यात आलेली आहे.

१) सन २०११ च्या लोकसंख्येची आकडेवारी व प्रगणक गटांचे नकाशे जनगणना कार्यालयाकडून प्राप्त करुन घेतलेले आहेत. ज्या ठिकाणी जनगणना कार्यालयाकडून माहिती प्राप्त झालेली नाही. तेथे २०११ ची लोकसंख्या सर्वेक्षण करुन निश्चित करण्यात आलेली आहे. याबाबत आवश्यक ते प्रमाणपत्र संचालक, जनगणना कार्यालय यांच्याकडून घेण्यात आलेले आहे. (*)

२) प्रभाग रचना करण्याकरीता गुगल मॅप व जनगणना कार्यालयाकडील प्राप्त प्रगणक गट नकाशांचा वापर करण्यात आलेला आहे.

३) प्रभाग रचना तयार करताना अधिनियम, नियम तसेच राज्य निवडणूक आयोगाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश, निदेश व सूचना यांचे तंतोतंत पालन करण्यात आलेले आहे.

स्वाक्षरी

ठिकाणः----------------

दिनांकः---------------

(नाव ------------------------)

तहसिलदार तथा प्रशासक, चंदगड, नगरपंचायत

जिल्हा - कोल्हापूर

(*) सदर मजकूर आवश्यक असेल तेथेच नमूद करण्यात यावा.